महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका, मुख्य इमारत
शिवाजी नगर पुणे - ४११००५
Emailid:mco@punecorporation.org
फोन क्र. ०२०- २५५०११००
जावक क्र. मआ/साप्रवि/ ६८७४
दिनांक : ३०/१२/२०२०

## -आदेश -

विषय:- कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाच्या प्रतिबंध व नियंत्रण याबाबतचे सुधारित आदेश-लॉकडाऊन टप्प्याटप्प्याने उठविणे आणि या कालावधीत प्रतिबंधने कमी करणेबाबत (मिशन बिगिन अगेन).
३१ डिसेंबर ,२०२० व नूतन वर्ष मार्गदर्शक सूचना.

संदर्भ :- १) अधिसूचना सार्वजनिक आरोग्य विभाग,गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल,मंत्रालय मुंबई क्रमांक कोरोना २०२०/प्र क्र.५८/आरोग्य- ५, दिनांक १४ मार्च २०२०
२) आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५
३) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम,१८९७
४) महसूल व वनविभाग,महाराष्ट्र शासन यांचे आदेश क्र. DMU/2020/CR.92/DISM 1 दिनांक १७ एप्रिल २०२०, २१ एप्रिल २०२०,२९ जून २०२०,६ जुलै २०२०, ३१ जुलै २०२०, ३१ ऑगस्ट २०२०, ३० सप्टेंबर २०२०, १४ ऑक्टोबर २०२०, २३ ऑक्टोबर २०२०,३ नोव्हेंबर २०२०,१४ नोव्हेंबर २०२०,२३ नोव्हेंबर२०२०, २७ नोव्हेंबर २०२०,२१ डिसेंबर २०२०
५) महाराष्ट्र शासन, गृह विभाग, मुंबई यांचे आदेश आरएलपी-१२२०/प्र.क्र.२५१/विशा १ ब दिनांक २८ डिसेंबर २०२०

ज्याअर्थी, उपरोक्त संदर्भ क्र. ४ मधील आदेशान्वये राज्य शासनाने महाराष्ट्र राज्यात निर्बंध शिथील व टाळेबंदी टप्प्याटप्प्याने उठविणे (मिशन बिगिन अगेन ) संदर्भात कोविड - १९ या आजाराच्या प्रसारास प्रतिबंधीत करण्यासाठी उपाययोजना व मार्गदर्शक सुचना निर्गमित केलेल्या आहेत.

ज्याअर्थी, सदर अधिनियमांतर्गत राज्यात कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या कोविड-१९ या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण करण्यासाठी महाराष्ट्र कोविड -१९ उपाययोजना नियम -२०२० अंमलात आलेले आहेत. महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम २०२० अन्वये कोविड-१९ च्या प्रसारास पुणे महानगरपालिका क्षेत्रात प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना प्राधिकृत केलेले आहे. साथरोग अधिनियम १८९७ व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विक्रम कुमार, आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे महापालिका क्षेत्रात ३१ डिसेंबर ,२०२० व नूतन वर्ष साजरा करणे बाबत आदेश व मार्गदर्शक सूचना निर्गमित करीत आहे .

१. कोरोनाच्या अनुषंगाने दिनांक ३१ डिसेंबर २०२० रोजी सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी व १ जानेवारी २०२१ रोजी नववर्ष स्वागताच्या निमित्ताने नागरिकांनी घराबाहेर न पडता नववर्षाचे स्वागत घरी साधेपणाने साजरे करावे.

२. नागरिकांनी ३१ डिसेंबरच्या दिवशी पुणे महानगरपालिका क्षेत्रामधील उद्याने, मैदाने, पर्यटनस्थळे तसेच रस्त्यावर अशा सार्वजनिक ठिकाणी मोठ्या संख्येने गर्दी न करता सोशल डिस्टन्सींग (सामाजिक अंतर) तसेच मास्क व सॅनिटायझरचा वापर होईल याकडे विशेष लक्ष देऊन नागरिकांनी आरोग्याच्या दृष्टीने काळजी घेणे आवश्यक आहे.

३. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर ६० वर्षावरील नागरिकांनी तसेच १० वर्षाखालील बालकांनी सुरक्षिततेच्या व आरोग्याच्या दृष्टीने शक्यतोवर घराबाहेर जाणे टाळावे.

४. कोणत्याही प्रकारे गर्दी आकर्षित होणार नाही अशा धार्मिक/सांस्कृतिक कार्यक्रमाचे अथवा मिरवणुकीचे आयोजन करण्यात येवू नये.

५. पुणे महानगरपालिका क्षेत्रामधील सर्व हॉटेल्स, फूड कोर्ट, रेस्टॉरंट व बार सदर कालावधीमध्ये रात्री १०.४५ पर्यंतच सुरु राहणार असून सदर आस्थापना रात्री १०.४५ वाजता बंद होतील. तसेच होम डिलेवरी सुविधा देखील रात्री १०.४५ वाजता बंद होईल.

६. नूतन वर्षाच्या पहिल्या दिवशी बहुसंख्य नागरिक धार्मिक स्थळी जात असतात. अशा वेळी त्या ठिकाणी एकाच वेळी गर्दी न करता सोशल डिस्टन्सींग चे पालन करावे. तसेच संबंधितांनी आरोग्य व स्वच्छतेच्या दृष्टीकोनातून योग्य त्या खबरदारीच्या उपाययोजना कराव्यात.

७. फटाक्यांची आतिषबाजी करण्यात येवू नये . ध्वनी प्रदूषणा संदर्भातील नियमांचे व तरतुदींचे काटेकोर पालन करण्यात यावेत.

८. यासंदर्भात मे. महाराष्ट्र शासन ,गृह विभाग यांनी दिनांक २८ डिसेंबर २०२० रोजी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे बंधनकारक राहील.

९. संदर्भीय आदेशान्वये वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश/मार्गदर्शक सूचना पुढील आदेशापर्यंत लागू राहतील.

१०. कोविड -१९ च्या प्रतिबंधासाठी पुणे महानगरपालिकेने यापूर्वी वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश/मार्गदर्शक सूचना पुढील आदेशापर्यंत लागू राहतील.

कोविड-१९ च्या प्रतिबंधासाठी या कार्यालयाद्वारे वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या आदेशांचे, मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन करणारी व्यक्ती आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम ५१ ते ६०, तसेच भारतीय दंड संहितेचे कलम १८८ नुसार अन्य कायदेशीर तरतुदीनुसार कार्यवाहीस पात्र राहील.

सदरचा आदेश हा माझ्या सही व शिक्क्यानिशी आज दि. ३०.१२.२०२० रोजी दिलेला आहे.

MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF POONA
पुणे म्युनिसिपल कॉर्पोरेशन सन-१९५०
EST.1950

(विक्रम कुमार)
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

प्रत -१) मा.विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे

२) मा. पोलीस आयुक्त,पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे.

३) मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे.

४) सर्व क्षेत्रीय अधिकारी व संबधित विभाग प्रमुख

यांचेकडे माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित